सकाळ

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७, मुंबई ४०० ००१

क्रमांक : १०/एडीएम/प्रमाणपत्रे/२०२१/३७० दिनांक : १२-०५-२०२१

## शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभ्यासक्रम, प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. औषधनिर्माणशास्त्र, एच.एम.सी.टी., सरफेस कोटिंग टेक्नॉलॉजी पदविका अभ्यासक्रम तसेच प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी/ तंत्रशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँन्ड केटरिंग टेक्नॉलॉजी पदवी, प्रथम वर्ष वास्तुशास्त्र, बी. प्लॅनिंग पदवी अभ्यासक्रम (Under Graduate), प्रथम वर्ष एम.ई./ एम.टेक., एम. फार्म., फार्म.डी. (Post Baccalaureate), एम. आर्किटेक्चर, एम. प्लॅनिंग, एम. एचएमसीटी, एमबीए/ एमएमएस, एमसीए हे पदव्युत्तर पदवी (Post Graduate) या अभ्यासक्रमांचे प्रवेश केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेमधून करण्यात येतात. त्यासाठी अर्ज करताना प्रवेश नियमावलीत नमूद केलेल्या **आवश्यक त्या प्रकरणी लागू असणारी** खालील प्रमाणपत्रे सक्षम प्राधिकाऱ्यांकडून प्राप्त करून घेऊन ती तयार ठेवण्याबाबत प्रवेशोच्छुक उमेदवारांना याद्वारे सूचित करण्यात येत आहे.

- जात/ जमात प्रमाणपत्र (Caste/ Tribe Certificate) • आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गासाठी प्रमाणपत्र (EWS)
- जात/ जमात वैधता प्रमाणपत्र (Caste/ Tribe Validity Certificate) • दिव्यांगांबाबतचे प्रमाणपत्र (Person with Disability)
- नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate) • सैन्य दलातील प्रवर्गासाठीचे प्रमाणपत्र (Defence) (दिनांक ३१ मार्च २०२२ पर्यंत वैध) • अल्पसंख्यांक प्रगर्वासाठीचे प्रमाणपत्र (Minority Certificate)
- अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) • आधार क्रमांक व संलग्नित बँक खाते
- उत्पन्नाचे प्रमाणपत्र (Income Certificate)

प्रवेशासाठी लागणाऱ्या प्रमाणपत्रांची तपशीलवार माहिती संचालनालयाच्या **http://www.dtemaharashtra.gov.in** या संकेतस्थळावर पत्र क्रमांक : १०/एडीएम/प्रमाणपत्रे/२०२१/३६५, दिनांक : ११ मे, २०२१ अन्वये देण्यात आलेली आहे.

**डॉ. अभय वाघ**

संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**डी.जी.आय.पी.आर./२०२०-२१/४८५**

Kolhapur, Main
17/05/2021 Page No. 7